ISSN 2349-638X

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

MONTHLY PUBLISH JOURNAL

VOL-II | ISSUE-VII | JULY | 2015

**Address**
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

**Email**
- editor@aiirjournal.com
- aiirjpramod@gmail.com

**Website**
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# मानवी  जीवनात संगीत शिक्षणाचे महत्व

**श्री अश्विन कांबळे**

समता उच्च मा. विद्यालय

जोडजवळा तालुका लातुर

शिक्षण ही संकल्पना संस्कृती या संकल्ननेबरोबरच सुरू होते. शिक्षणाचा अर्थ एखाद्या विषयाचे शिक्षण अथवा एखाद्या पदवीपर्यंत मर्यादित नसुन, ते मानवी जीवनाच्या सर्वांगाला व्यापणारे असते शिक्षण या संकल्पनेत फक्त पुस्तकी शिक्षण अभिप्रेत नसुन जीवनाची घडन माणुसकीचा विकास, इतरांचा आदर करण्याची भावना, चरित्र्य संवर्धन, सहकार्याची भावना इत्यादी संकल्पना आत्मसात करता येणे आवश्यक ठरते. एवढेच नव्हे तर शिक्षण या संज्ञेत विविध प्रकारचे कौशल्य संस्कार मुल्येही अंतर्भुत आहेत.

**प्लेटो :** "प्रत्येक माणसात काही  विशिष्ट प्रमाणात जन्मजात निर्सदत्त शक्ती असतात. त्या जागृत करून पुर्णत्वास नेणे म्हणजे शिक्षण होय,"

**मॅगडुनल** : "शिक्षण म्हणजे सहजप्रवृत्तीचे उन्नयन होय."

**महात्मा गांधी :** "माणसाच्या शारीरिक मानसिक आणि अध्यात्मिक अंगाचा विकास व अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण होय."

**स्वामी विवेकानंद** : "शिक्षण म्हणजे मानवातील पुर्णत्वाचा आविष्कार होय."

**श्री. रा. नाईक** : "विद्यार्थ्यांना  नैसर्गिकपणे लाभलेल्या संगीतोपयोगी देणग्यांचा व्यक्तिगत विचार करून त्यांचा पध्दशीरपणे विकास घडवून आणणे, म्हणजेच संगीताचे शिक्षण देणे होय."

ही व्याख्या संगीताच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोणातुन केलेली आहे.

कोणतीही व्यक्ती परमेश्वराने दिलेल्या गुणांच्या जोरावर कष्ट करून एखादी गोष्ट साध्य करीत असते. संगीताच्या दृष्टिकोणातुन विचार केल्यास ज्यांना आवाजाची निसर्गदत्त देणगी असते त्यांना गुरूच्या मार्गदर्शनाने संगीत कला आत्मसात होऊ शकते. उत्तम कलाकार म्हणुन ते आपले स्थान निर्माण करू शकतात.

मानसशास्त्रज्ञांनी मानवी जीवनाच्या पाच अवस्था मानल्य आहेत.

शैशावावस्था, बाल्यावस्था, कुमार अवस्था , प्रौढ आवस्था व वृध्दावस्था.

## १.शैशावावस्था :

साधारणत १ ते ५ वर्षे हा शैशव अवस्थेचा काल मानला जातो. तिसऱ्या वर्षापासुन सोपे शब्दोच्चार, आकर्षक चालींची व चटकन ठोका धरता येतील अशी लयप्रधान गीते मुलांना शिकवावीत. बडबडगीते, झुकझुक आगीन गाडी, येरे येरे पावसा अशी गीते शिकवल्यामुळे नकळतपणे स्वरांचे व लयींचे संस्कार त्यांच्यावार होतील. यामुळे पाठांतर चटकन होईल सर्वांसमोर म्हणावयास सांगीतल्यानंतर सभाधीटपणे हाही गुण नकळतपणे वाढीस लागेल.

## २. बाल्यावस्था

साधारणत ६ ते १२ हा बाल्य अवस्थेचा काल मानला जाते या वयात प्रार्थना म्हणणे, राष्ट्रगीत किंवा राष्ट्रीय कार्यक्रमांच्या वेळी समरगीते, देशभक्तीपर गीते शिकवावीत. यातुन एकाग्रता वाढेल व शिस्त अंगी बाणली जाईल. शास्त्रीय संगीतातील रंगांची चिजा शिकवाव्यात. थोर कलाकारांच्या चरित्रांद्वारे त्यांच्यात संगीताच्या अभ्यासाची स्फुर्ती निर्माण करावी.

## ३. कुमारावस्था :

साधारणत १३ ते १८ वर्षे हा कुमार अवस्थेवर काल मानला जातो. या वयोगटातील विद्यार्थी संघप्रिय व अनुकरणप्रिय असतात. संगीताची आवड निर्माण झाल्यामुळे संगीत शिकण्याची ओड व त्यातच करिअर करण्याची इच्छा विद्यार्थ्यांच्या मनात उत्पन्न झाल्यास अनुकरण अंधानूकरण होणार नाही.

याची काळजी घेणे क्रमप्राप्त आहे. संगीत कलेत कलाकार म्हणुन पुढे जाण्यासाठी लागणारा आत्मविश्वास सभाधिटपणे या गोष्टी विद्यार्थ्यांमध्ये जागृत होतात झाल्या पाहिजेत व ही जबाबदारी शिक्षकांची आहे स्वर,तार,शब्दउच्चार रसभावना श्रोत्यांशी संवाद साधण्याची कला या गोष्टी आत्मसात करता येणे आहे.

## ४.प्रोढावस्था

साधरणता १९ ते ५० वर्षे हा प्रोढ अवस्थेचा काल मानला जातो. या अवस्थेत विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीचा पूर्ण विकास झालेला असतो. आयुष्यात आपल्याला कोणती दिशा निवडायची आहे, याचे दृढीकरण झालेले असते. सरवर विकास होण्यासाठी शास्त्रीय संगीतासाठी योग्य शिक्षक मिळणे आवश्यक आहे. हे झाल्यास पुढील गोष्टी सोप्या असतात.

## ५.वृध्दावस्था

साधारणत: ५० वर्षांनंतरचा काल हा वृध्द अवस्थेचा काल मानला जातो. संगीताच्या दृष्टीने ही एक महत्वाची अवस्था आहे. कलाकार म्हणून नाव मिळाल्यावर आपल्या ज्ञानाचा व अनुभ्वाचा फायदा होतकरू विद्यार्थ्यांना करून देणे हे या अवस्थेतील महत्वाचे कार्य.

## संदर्भ :–

१. देशपांडे वामन हरी :– अभीजात संगीत – छंद – १९५६.

२. देसाई चैतन्य :– प्राचीन संगीत – छंद – १९५६

३. ओ. गोस्वामी :– द हिस्टरी ऑफ इंडियन म्युझिक